न्यायालयीन प्रकरणाचा निकाल संबंधी गठीत करण्यात आलेल्या समितीची
घेण्यात आलेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.

क्रमांक- पोअअ/निकाल तपासी यंत्रणा /५११३/२०१७,अकोला दिनांक:18 MAR 2017

**विषय :- दिनांक १०.०३.२०१७ रोजी घेण्यात आलेल्या न्यायालीयन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणा मुळे शासनाचे विरुध्द गेला असल्यास, संबंधीतांवर जबाबदारी निश्चितच करण्यासाठी गठीत समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत**

दिनांक १०/०३/२०१६ रोजी १७/३० वाजता अपर पोलीस अधिक्षक, अकोला यांचे दालनात न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणा मुळे शासनाचे विरुध्द गेला असल्यास,संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत समितीची बैठक आयोजित करण्यात आली असता, त्यामध्ये खालील अधिकारी उपस्थित होते.

०१. श्री. विजयकांत सागर, अपर पोलीस अधीक्षक, अकोला.
०२. श्री. पंकज महाले, सहायक,सरकारी अभियोक्ता,न्यायालय, अकोला.
०३. श्री.कैलास नागरे,पो.निरीक्षक,स्था.गु.शाखा,अकोला.

सर्व प्रथम मिटींग मध्ये हजर अधिका-यांचा परिचय घेण्यात आला व मिटींग घेण्याचा उददेश कळविण्यात आले. यापुर्वी सदरची मिटींग दिनांक१३/२/२०१७ रोजी आयोजीत करण्यात आली होती. परंतु सहाय्यक संचालक सरकारी अभियोक्ता हे काही महत्वाचे कामात व्यस्त असल्याने सदरची मिटींग होवू शकली नाही. त्याअनुषंगाने उपरोक्त नमुद मिटींग आज दिनांक १०/३/२०१७ रोजी घेण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग कडील दिनांक १७ ऑक्टोबर २०१५ चे शासन परिपत्रक न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास,संबंधितावर जबाबदारी निश्चीत करण्यासाठी व त्याबाबतच्या शिफारसी करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत सुचित करण्यात आले होते. त्याअनुषगाने दिनांक १६/१/२०१७ रोजी अकोला जिल्हयात, जिल्हास्तरीय समिती शासनाचे सुचने प्रमाणे गठीत करण्यात आली.
त्यामध्ये १.अपर पोलीस अधीक्षक,-अध्यक्ष,
२.पोलीस निरीक्षक (स्था.गु.शाखा,)-सदस्य,
३.सहाय्यक सरकारी अभियोक्ता- सदस्य राहतील.

दिनांक १७ ऑक्टोबर,२०१७ चे महाराष्ट्र शासन गृह विभाग यांचे परिपत्रक वाचुन त्यामधील सुचनां बाबत अवगत करण्यात आले. गुजरात राज्य विरुध्द किशन भाई या न्यायालयीन प्रकरणाच्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०७.०१.२०१४ च्या आदेशान्वये सर्व राज्यातील गृह मंत्रालयांना कसुरदार तपासी अधिकारी व अभियोक्त्यांच्या विरुध्द कारवाई तसेच तपासी यंत्रणा सक्षम करण्याबाबत आणि अभियोक्तांची न्यायालयीन खटल्यातील कार्यक्षमता वाढविण्यासाठी परिणामकारक धोरण अंमलात आणण्यासंदर्भात मार्गदर्शन सुचना केल्या आहेत.

" We direct the Home Department of every state Government,to formulate a procedure for taking action against all erring investigating/prosecuting officers. All such erring official/officer identified,as responbsible for failure of a prosecution case,on account of sheer negligence or because of culpable lapses,must suffer departmental action. The above mechanism formulated would infuse seriousness in the performance of investigating and prosecuting duties,and would ensure that investigation and prosecution are purposeful and decisive. The instant direction shall also be given effect to within 6 months"

मा.सर्वोच्च न्यायालयाने वरील प्रमाणे दिलेल्या मार्गदर्शन सुचनांच्या अनुषंगाने ज्या गुन्हयामध्ये आरोपींची निर्दोष मुक्तता झाली आहे. त्याबाबतच्या न्यायालयाच्या निकालाची तपासणी करून सदर खटल्याचा निकाल शासनाच्या विरुध्द जाण्यामागील कारणे काय आहेत,याची तपासणी करणे व सदर न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास, त्यामध्ये दोषी आढळल्यास त्यासंबंधीचा प्रस्ताव शिस्तभंग विषयक कारवाई करण्यासाठी अहवाल मा.जिल्हा पोलीस अधिक्षक,/संचालक अभियोग संचालनालय,मुंबई यांच्या कडे सादर करणे बाबत सुचना देण्यात आल्याचे कळविण्यात आले.

उपरोक्त शासनाचे परिपत्रकातील दिलेल्या सुचना बाबत चर्चा करण्यात आली. तसेच सदर समितीची बैठक नियमितपणे घेतली जाईल याबाबत नियोजन करण्यात आले. सदर बैठकीमध्ये पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. दर तीन महिन्यात एकदा सदरची मिटींग घेण्यात येवून त्या मध्ये सदरहु काळात कोर्टातुन लागलेल्या निकालाचा अभ्यास करुन व केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेवून पुढील मिटीग मध्ये हजर यावे.
२. यापुढे शासन निर्णया प्रमाणे तिन महिण्यात एक वेळा मिटींग घेण्यात येईल.परंतु प्रशासकिय दृष्टया व कामाजाचे अनुषंगाने दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्या करिता प्रत्येक महिण्याचे १० तारखेला मिटींग घेण्याचे ठरविण्यात आले आहे. मिटींगला येताना कोर्टातुन लागलेल्या निकालाचा अभ्यास करुन केसेस निर्दोष सुटल्याचे दोषीविरुध्द कार्यवाही बाबतचे केसेस चर्चेस आणावे असे सुचित करण्यात आले आहे.
३. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी बैठकी दरम्यान मुद्दा उपस्थित केला की,सदर मिटीग मध्ये सरकारी अभियोक्ता हे सुध्दा सदस्य असणे जरुरीचे आहे. कारण त्यांचे कडे सेशन कमीट गुन्हे चालविण्यास येत नाही.फक्त जेएमएफसी/सिजीएम कोर्टासमोर चालणारे गुन्हे हे पाहतात. या अनुषंगाने संबंधीतांना पत्रव्यवहार करुन पुढिल बैठकीस उपस्थित राहण्यास कळविण्यात येईल असे ठरविण्यात आले.
४. यापुढे महत्वाचे निर्दोष निघालेल्या महत्वाचे केसेसचा सविस्तर आढावा घेवून ज्यांच्यामुळे सदर केस निर्दोष झाली त्यांचा कसुरी अहवाल संबंधीत विभागास पाठविण्यात येणार असे ठरविण्यात आले.
५. जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व त्यांचे कडील विधी अधिकारी यांनी सुध्दा आपले उपविभागातील निर्दोष निघालेल्या केसेसचा सविस्तर अभ्यास करुन दोषी अधिका-यांचा अहवाल सदर समितीच्या पुढिल बैठकिस सादर करावा असे आदेश त्यांना देण्यात आले.

या नंतर कोणालाही काही समस्या/अडचणी बाबत विचारणा करुन सदरची बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

(विजयकांत सागर)
अपर पोलीस अधीक्षक,अकोला

प्रति,

१.पोलीस निरीक्षक,स्था.गु.शाखा,अकोला
२.सहाय्यक संचालक,सरकारी अभियोक्ता कार्यालय, अकोला.

प्रत माहिती व उचित कारवाई साठी

१. सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, अकोला जिल्हा.
२. प्रभारी अधिकारी, सायबर सेल, अकोला. (सदर इतिवृत्तांत जिल्हा पोलीस दलाच्या वेबसाईटवर प्रसारीत करण्यासाठी)

प्रत सविनय सादर.

मा.पोलीसअधीक्षक, अकोला